जनार्थ आदिवासी विकास संस्था

# लोकजागर

अंक - ७ । मार्च २०१४

## स्त्री प्रजनन संस्थेचे आजार

१

### बाईच्या आरोग्याचे हे प्रश्नही समजून घेतले पाहिजेत! (भाग १)

स्त्रियांचे आरोग्य म्हटल्यावर फक्त गरोदरपणात आणि बाळंतपणात काळजी घेण्याची आवश्यकता आहे असा समज आहे. शासनसुद्धा 'स्त्रियांचे आरोग्य' असा स्वतंत्र विचार न करता प्रजनन (महिला म्हणजे केवळ प्रजनन!) व बाल आरोग्य (आर.सी.एच.) असा संयुक्त विचार करताना दिसते. बाईचे गरोदरपण, बाळंतपण याचा सरळ संबंध मातामृत्यु व बालमृत्यु यांच्याशी असल्याने आरोग्य सेवांचा सर्व भर स्त्रियांच्या याच अवस्थांवर बहुतांशपणे दिलेला आहे असे दिसते.

पण या अवस्थेच्या अलिकडे आणि पलिकडेही स्त्रियांच्या आरोग्याचे प्रश्न आहेत. मात्र त्यांच्याकडे समाजही फारसे लक्ष देत नाही आणि शासनही दखल घेत नाही. आरोग्याच्या छोट्यामोठ्या समस्यांबाबत मोकळेपणी कोणाशी बोलण्याची किंवा माहिती मिळण्याची जागाही उपलब्ध नसल्याने, बऱ्याच बाया हे नैसर्गिकच असेल असे मानून मुकाट सहन करत जगतात.

प्रजनन मार्गात जंतुसंसर्ग, कुपोषणाचा प्रभाव, यापासून ते कॅन्सर सारख्या गंभीर आजारांची माहिती मिळणे, त्यावरही औषधोपचार मिळण्यासाठी तरतूद होणे, याबद्दल बोलायला वाटणारा संकोच दूर करणारे वातावरण समाजात तयार होणे या सर्वच गोष्टींसाठी प्रयत्न व्हायला हवेत.

लोकजागरच्या या तीन अंकांमध्ये या संदर्भात माहिती देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. आपल्या घरातल्या, गावातल्या बायांपर्यंत ही माहिती पोचवायला गाव आरोग्य समितीने, तसेच इतर गावकऱ्यांनी सहकार्य करावे असे नम्र आवाहन.

| | |
|---|---|
| ओटीपोटात सूज | ०३ |
| गर्भाशयात तयार होणाऱ्या गाठी | ०५ |
| गर्भाशय बाहेर येणे | ०७ |

नदीवर कपडे धुण्यासाठी गेलेल्या भागू आणि सकू दोघी एकमेकींशी गप्पा मारायला लागल्या.

**भागुबाई:** मागच्या काही महिन्यांपासून माझ्या खालच्या जागेतून काहीतरी बाहेर आल्यासारखं मला वाटत आहे. आता दवाखान्यात जायचं म्हणजे ते दाखवाव लागेल. आता तूच सांग मी कसं जावं? मला तर बाई लाज वाटते.

**सकू:** ते पण खरच आहे, शेजारच्या गावात एक भगत राहतो. तू त्याच्याकडून काही इलाज होतो का ते बघ.

**भागुबाई:** होय ग सकू, कविताने पण मला हेच सांगितलं आणि ती माझ्याबरोबर आली पण होती. कोणीतरी करणी केली आहे असं म्हणून त्या भगताने मला अंगारा दिला खायला. पण काही फरक पडलाच नाही. आता त्याला पण सहा महिने होऊन गेले. उलट जसजसं दिवस चाललेत तर एकदम हाता पायातली शक्तीच निघून गेल्यासारखं होतंय. चालायला पण त्रास होतो बघ.

**सकू:** मग तू गावात येणाऱ्या नर्स बाई बरोबर बोलून बघ. नाहीतरी त्या दवाखान्यातच असतात. त्यांना भेटून त्या काय सांगतात ते बघ. मी येईन तुझ्याबरोबर. एकीला दोघी असतील तर जरा बर वाटेल.



**भागुबाई:** चालेल, मग आजच जाऊ आपण दवाखान्यात नर्स बाईला भेटायला. बघू त्यांच्या इलाजाने काही फरक पडतो का ते.

भागुबाई नर्सबाईला तिचं दुखणं सांगतात, नर्सबाई तिची तपासणी करतात. भागुबाईची गर्भाशयाची पिशवी खाली सरकलेली आहे असं तपासणीत कळतं. नर्सबाई तिला जिल्ह्याच्या सरकारी दवाखान्यात जावून डॉक्टरांना दाखवायला सांगतात. शेजारी राहणारी सरिता आता गावची 'आशा' झालेली. भागुबाई सरिताला घेऊन जिल्ह्याच्या दवाखान्यात जाते. डॉक्टर 'ऑपरेशन करुन गर्भाशय काढायला लागेल' असं सांगतात.

भागुबाईला आलेला अनुभव आपल्यातील काही जणींना अनुभवायला मिळाला असेल. बायांच्या प्रजनन संस्थेशी निगडीत असलेल्या अशा आजारांसाठी देखील सेवा मिळणे आवश्यक आहे. गरोदरपण आणि बाळंतपण या सेवे व्यतिरिक्त बायांचे जे इतर आजार आहेत त्याबद्दल सेवा मिळणं गरजेचं आहे हे बहुतेकांच्या ध्यानात येतच नाही. त्यामुळे ह्या आजारांकडे लक्ष दिलं जात नाही. या बद्दल फारसं बोललं देखील जात नाही.

मासिक पाळीच्या वेळी अस्वच्छता, आंघोळीसाठी व्यवस्थित सोय नसणे, असुरक्षित गर्भपात आणि बाळंतपणाच्या वेळी योग्य काळजी घेतली जात नसल्यामुळे स्त्रियांमध्ये प्रजननमार्गाचे आजार मोठ्या प्रमाणावर आढळतात.

स्त्रिया आजार बराच काळ अंगावर काढतात, दुखणं सहन करतात. दवाखान्यात जाऊ शकत नाहीत. आपल्याला होणाऱ्या त्रासाबद्दल बोलायचं नाही तर ते सहन करायचे असाच समज आपल्याकडे आहे. अशा कारणांमुळे त्यावर योग्य ते उपचार वेळेवर केले जात नाहीत.

वेळेवर उपचार न केल्यामुळे प्रजनन संस्थेचे आजार खूप गंभीर होऊ शकतात तर कधी कधी यामुळे मृत्यूही होऊ शकतो.

## बायांना हे आजार कशामुळे होतात?

- गरिबीमुळे स्वच्छ पाणी, सुरक्षित घर व शिक्षण मिळत नाही.
- पुरेसा व सकस आहार मिळत नाही, त्यामुळे कुपोषण होते.
- कामाचा बोजा, सततची बाळंतपण आणि त्यामुळे आजारपणं येतात. औषधोपचार वेळेवर होत नाहीत.
- पुरुषप्रधान समाजरचनेमुळे स्त्रियांना भेदभावाची वागणूक मिळते.
- अपुऱ्या आणि त्यातही स्त्रियांचा विचार न करणाऱ्या आरोग्य सेवा. लैंगिक आणि प्रजनन आरोग्याच्या सेवा केवळ विवाहित स्त्रियांना पुरवण्याकडे कल असल्याने इतर स्त्रियांना आरोग्य सेवा मिळत नाहीत.
- प्रजननमार्गाच्या किंवा लिंगसांसर्गिक आजारांबद्दल मोकळेपणी बोलले जात नसल्याने त्याविषयी उपचार घेण्यात उशीर होतो. तसंच पुरुषांचं सहकार्य मिळत नसल्याने उपचार अर्धवट होतात.

## गर्भाशय बाहेर येणे
### (अंग बाहेर येणे)

गर्भाशय बाहेर येणे म्हणजे गर्भाशय त्याच्या मूळच्या जागेवरून खाली येणे, खालच्या दिशेने घसरणे. त्याची मुख्य कारणे खालीलप्रमाणे असतात–

- गर्भाशयाला आधार देणारे स्नायू सैल पडल्यामुळे गर्भाशय बाहेर येते. बाळंतपणाच्या वेळी कळा यायला लागल्यावर लगेच स्त्रीने जोर केला तर गर्भाशयाच्या स्नायूंवर ताण पडतो. तसे केल्यास बाळंतपणानंतर स्नायू सैल पडून अंग बाहेर येऊ शकते. गर्भाशयाचं तोंड उघडेपर्यंत जोर लावू नये.



बाहेर आलेले गर्भाशय

- बाळंतपण झाल्यावर किंवा गर्भपातानंतर स्त्रीने किमान दीड महिना विश्रांती घ्यायला हवी. या काळात कोणतीही जड कामे करू नयेत. बाळंतपणानंतर लगेच कामाला सुरुवात केल्यास गर्भाशयाच्या स्नायूंवर ताण पडतो आणि त्यामुळे गर्भाशय मूळ जागी येणे अवघड होते. परंतु अनेक स्त्रियांना अशी विश्रांती मिळत नाही त्यामुळे गर्भाशयाच्या स्नायूंवर ताण येऊन ते सैल पडतात. त्यामुळे नंतर गर्भाशय बाहेर येऊ शकते.
- लहान वयामध्ये गरोदर राहणे.
- बाळंतपणानंतर जंतुबाधा होणे.
- एकामागोमाग एक सततची बाळंतपणं होणे किंवा वारंवार गर्भपात होणे यामुळे गर्भाशयाचे स्नायू सैल पडतात.

मासिक पाळी गेल्यानंतर ओटीपोटाचे स्नायू आंकुचन पावून हा त्रास जास्त जाणवतो.

## गर्भाशय बाहेर येण्याचे तीन टप्पे आहेत. त्यानुसार स्त्रीला काही लक्षणे जाणवू शकतात.




सर्वसाधारण गर्भाशय




१

गर्भाशय बाहेर येण्याचा **पहिला टप्पा**




२

गर्भाशय बाहेर येण्याचा **दुसरा टप्पा**




३

गर्भाशय बाहेर येण्याचा **तिसरा टप्पा**

१ **पहिला टप्पा :** ओटीपोटात रग लागणे, कंबरदुखी, अंगावरून जास्त पांढरे जाणे, लैंगिक संबंधांच्या वेळी त्रास होणे.

२ **दुसरा टप्पा :** ओटीपोटात जड वाटू लागणे. काही तरी निसटल्यासारखे, सुटत असल्यासारखे वाटणे. मायांगामध्ये सतत काही तरी असल्यासारखे वाटणे.ओटीपोटात ओढ लागल्यासारखे दुखणे.

मायांगावर ताण पडल्यासारखे वाटणे. मांड्यांना रग लागणे. अंगावरून पांढरे जाणे. लैंगिक संबंध ठेवणे अवघड जाणे किंवा संबंध करताना खूप दुखणे. कधी कधी लघवीचा त्रास पण होतो जसे नकळत लघवी होणे किंवा वारंवार लघवी होणे.

३ **तिसरा टप्पा:** खोकला आला किंवा दोन पायावर बसले कि गर्भाशय योनीच्या बाहेर पडलेले दिसते. त्याचबरोबर ओटीपोटात जड वाटणे, चालताना दोन मांड्यांमध्ये काहीतरी आल्यासारखे वाटणे, ओटीपोटात आवळून धरल्यासारखे दुखणे, कंबर दुखणे, अंगावरून जास्त प्रमाणात पांढरे जाणे, वारंवार लघवीला होणे, नकळत लघवी होणे आणि लैंगिक संबंधांच्या वेळी खूप दुखणे.

### उपचार :

**पहिल्या व दुसऱ्या टप्पामध्ये** बांगडी बसवण्याचा उपचार करता येतो. तसेच योनीमार्गाच्या स्नायूंच्या आंकुचन प्रसरणाच्या व्यायामाचा चांगला उपयोग होतो. त्यामुळे गर्भाशय मूळ जागी जायला मदत करता येते.

**तिसऱ्या टप्प्यामध्ये** गर्भाशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया करावी लागते.

सुधाचं लग्न झालं आणि ती गावात राहायला गेली. तशी ती लहानाची मोठी झाली ती शहरातच पण लग्नानंतर मात्र गावात राहायला लागली. शहरी वातावरण आणि गावाकडची परिस्थिती यात बराच फरक तिला जाणवत होता. पण तिला अशी काही अडचण आली नाही. तिची कुठल्याच गोष्टींसाठी तक्रार नव्हती. एक गोष्ट मात्र होती जी तिला अजिबात पटायची नाही, ती म्हणजे घरातल्या सगळ्या बायका आपली मासिक पाळी आली कि वेगळं बसायच्या आणि पाळी संपली कि वापरलेलं कापड कुठेतरी पत्र्यात कोचून ठेवायच्या. शहरात राहिलेली आणि शिक्षण झालेल्या सुधाला या अस्वच्छतेमुळे आजार होऊ शकतात हे माहित होत. त्यामुळे जे चालू आहे ते तसंच चालू राहू नये या विचाराने तिने घरातल्या आपल्या जावा आणि नणंदा यांच्याशी बोलायचं ठरवलं. सगळ्यांशी काम करता करता बोलणं सुरु झालं तर कळालं कि तिच्या जावेला अंगावरून जाण्याच्या त्रास आहे, तिच्या अंगावरून जे जातं ते हिरव्या रंगाचं वास देणार काहीतरी जातं. एवढचं नाही तर तिचं ओटीपोट आणि कंबरपण सारखी दुखत असते. सुधाने सगळ्यांना पाळीत वापरलेले कापड स्वच्छ धुवून पिशवीत ठेवायला सांगितले आणि तसं केलं नाही तर आजार होऊ शकतात हे पण सांगितलं. ती तिच्या जावेला घेऊन दवाखान्यात गेली तर तिच्या ओटीपोटाला सूज आली आहे हे डॉक्टरांनी सांगितले आणि औषधे लिहून दिली.

## स्त्री-प्रजननसंस्थेचे सामान्य आजार

### ओटीपोटात सूज
### (गर्भाशय, बीजाशय व बीजनलिकेची सूज)



सूज आलेले गर्भाशय

गर्भाशय, बीजाशय व बीजनलिकेला जंतुदोषामुळे सूज आल्याने हा आजार होतो. सूज आणणारे जंतू स्त्रीच्या योनीतून गर्भाशयात येतात आणि बीजनलिकेमार्फत बीजाशयापर्यंत जातात. या आजारालाच ओटीपोटात सूज येणे असेही म्हणतात.

**या आजारात खालील लक्षणे दिसून येतात–**

- ओटीपोट व कंबर खूप दुखते.
- पुरुषाशी संबंध येताना खूप दुखते व रक्तस्राव होतो.
- पिवळट हिरवे वास येणारे पाणी अंगावरून जाते.
- खूप ताप येतो.
- सतत अशक्तपणा वाटतो.

**ओटीपोटात सूज येऊ शकण्याची कारणे :**

* बाळंतपणाच्या वेळी किंवा गर्भपात करून घेताना किंवा तांबी बसवताना स्वच्छता नसल्यामुळे झालेल्या जंतूसंसर्गामुळे.
* ओटीपोटावरच्या शस्त्रक्रिया म्हणजेच सिझेरियनची शस्त्रक्रिया, स्त्री नसबंदी, गर्भाशय काढून टाकणे यासारख्या शस्त्रक्रियांच्यावेळी झालेल्या जंतुसंसर्गामुळे.
* लिंगसांसर्गिक आजारामुळे.
* बीजनलिकेस क्षयरोग झाल्यामुळे.
* अस्वच्छ (खराब) कपडे पाळीच्या वेळी वापरल्यामुळे.

**या आजारावर उपचार केले नाही तर होणारे परिणाम :**

* बीजनलिकेला सूज आल्यामुळे कधी–कधी ही नलिका बंद होते आणि स्त्रीला वंध्यत्व येते.
* बीजनलिकेमध्ये गर्भ राहू शकतो.
* वेळेवर व पूर्ण उपचार केले नाही तर पोटदुखी कायमची राहते.
* पूर्ण उपचार केले नाही तर हा आजार गंभीर होऊन कधी कधी मृत्यूसुद्धा येऊ शकतो.






सुलूबाईच्या मुलीच्या बाळंतपणाचे दिवस जवळ आले होते, सुलूबाई बाळंतपण कसं होणार या काळजीत होती. लग्नानंतर ५ वर्षांनी तिची पोरगी गरोदर राहिली होती त्यामुळे आनंद तर होता पण काळजी पण वाटत होती. पोरीला घेऊन सुलूबाई दवाखान्यात होती, अचानक सुलूबाईला पाळी सुरु झाली. ८ दिवसांआधीच तिची पाळी आली होती. खरंतर मागच्या ८- ९ महिन्यांपासून पाळी ३ आठवड्याला यायला लागली होती, अंगावरून पण नेहमीपेक्षा जास्त जात होतं. सुलूबाईने या गोष्टींकडे लक्ष दिलं नाही. ओटीपोटात जास्त दुखायला लागल्यावर तेवढ्यापुरतं आराम करायचा असं चाललं होतं. आता दवाखान्यात येताना पाळीचे कपडे आणले नव्हते. सुलूबाईने जरा घाबरत नर्सबाईला सांगितलं, नर्सबाईने तिला दवाखान्यातील पॅड दिले. सुलूबाईला यावेळी जास्तच जात होतं, चक्करही येत होती अन पोटात पण खूप दुखत होतं. पोरीला तपासायला डॉक्टर आल्यावर तिने तिच्या त्रासाबद्दल त्यांना सांगितलं. डॉक्टरांनी तिची तपासणी केली, कधीपासून त्रास होतो हे विचारलं. सुलूबाईने त्यांना ८-९ महिन्यांपासून काय त्रास होतो ते सगळं सांगितलं. सुलूबाईने सांगितलेली माहिती अन तपासणीतून त्यांनी सुलूबाईच्या गर्भाशयात गाठी असतील असा अंदाज केला. सध्या गोळ्या दिल्या नंतर गाठीचा तुकडा तपासून घ्यायला लागेन त्यानंतर बघू असं सांगितलं. पोरीचं सगळं व्यवस्थित झाल्यावर आपलं बघू असं तिनं डॉक्टरांना सांगितलं. पोरगी सुखरूप बाळंत झाली. ३ महिन्यांनी पोरगी सासरी गेली. या तीन महिन्यात सुलूबाई पाळीच्या त्रासामुळे पार वैतागून गेली होती. पोरगी गेल्यानंतर सुलूबाई दवाखान्यात गेली, गाठीचा तुकडा तपासायला दिला. तपासणीतून कळालं की गर्भाशयाच्या वर फायब्रॉईडची गाठ होती. ऑपरेशन करून ती गाठ काढून टाकली. सुलूबाईचा सगळा त्रास ऑपरेशननंतर थांबला.

## *गर्भाशयात तयार होणाऱ्या गाठी*
## *(फायब्रॉईड)*




पेशींच्या अनियमित वाढीमुळे गर्भाशयात गाठी तयार होऊ शकतात. कधी कधी एकाच वेळी एकाहून जास्त गाठी होऊ शकतात आणि आकाराने कितीही वाढू शकतात. ह्या गाठींना 'फायब्रॉईड' असे म्हणतात.

बऱ्याचदा अशा गाठी कोणताही त्रास देत नाहीत आणि म्हणून त्यावर उपचार करण्याचीही गरज नसते. पण त्यांच्या वाढणाऱ्या आकारामुळे किंवा त्यात काही बदल झाल्यामुळे त्या कधी कधी त्रासदायक ठरतात अशा वेळी उपचाराची गरज असते.

**या गाठींमुळे खालील त्रास होऊ शकतो–**

- काही स्त्रियांमध्ये या गाठींमुळे अनियमित रक्तस्त्राव होतो.
- ओटीपोटात दुखते किंवा ओटीपोटात जड वाटते.
- मासिक पाळीच्या वेळी रक्तस्त्राव जास्त होतो.
- काहींना अंगावरून जास्त पांढरे जाऊन खाज येते.
- वारंवार गर्भपात होतात.
- लैंगिक संबंधांच्यावेळी दुखते.

ही गाठ लहान असेल तर पाळी बंद होण्याच्या वेळी लहान होते व काही त्रास होत नाही. पण काही वेळा या गाठींचा खूप त्रास होतो व त्यामुळे ती काढून टाकावी लागते. गाठ गर्भाशयाच्या वर असेल तर नुसती गाठ काढता येते पण गर्भाशयात असेल तर संपूर्ण गर्भाशय काढावे लागते.

## आपण काय करु शकतो...

- **स्त्री–प्रजनन संस्थेच्या आजाराबद्दल माहिती समजून घ्यायला पाहिजे.**
- **प्रजनन संस्थेसंबंधित झालेल्या कोणत्याही आजाराकडे दुर्लक्ष करून अंगावर काढू नये.**
- **प्रजनन संस्थेसंबंधित झालेल्या काही आजारांसाठी स्त्री–पुरुष दोघांनीही उपचार घेतले पाहिजेत. यासाठी पुरुषाने पुढाकार घेतला पाहिजे.**

संदर्भ पुस्तिका: स्त्री प्रजनन संस्थेचे आजार व घ्यावयाची काळजी – जनार्थ व साथी, स्त्रियांसाठी डॉक्टर नसेल तेथे – स्त्रीहितकारिणी, संकेतस्थळे

जनार्थ आदिवासी विकास संस्था
प्लॉट नं. ८, रमागिरी, विजयनगर, शहादा–४२५४०९, जि.–नंदुरबार
☎ ०२५६५–२२३१६५/ २२५४९५ ईमेल : janarthorg@rediffmail.com

UKaid
ऑक्सफैम इंडिया OXFAM India